# bhavishyavani भविष्यवाणी

bhavishya ALLIANCE

भविष्य अलायन्सचे मासिक बातमीपत्रक — डिसेंबर २००८


अंतरंग –


- बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी डे केअर सेंटर्स.
- धारावीतील डे केअर सेंटर्स-मुलांच्या वजनात वाढ.
- जी जी जी प्रकल्प पहाणी –नियोजन मांडणी बैठक
- ''हात धुणे'' प्रकल्पातील मुख्य प्रशिक्षकांचे नंदुरबारमध्ये प्रशिक्षण.
- संगणकाच्या सहाय्याने प्रौढ साक्षरता कार्यक्रम.
- ''यशोदा '' प्रकल्प –शिशू आहारा संबंधी वर्तणूक बदल व संवाद कार्यक्रम.


## आजपर्यंत

### बांधकाम प्रकल्पांच्या ठिकाणी डे केअर सेंटर :-



सिडको खारघर, नवी मुंबई, येथील डे केअर सेंटर

प्रतीक्षानगर (सायन), गणेश नगर (मालाड) आणि घरकुल (खारघर) हया तीनही ठिकाणी सुरु असलेल्या अंगणवाडी केंद्रांमध्ये एकात्मिक बाल विकास यंत्रणेने, अंगणवाडी कार्यकर्त्या आणि मदतनीस यांची नेमणूक केलेली आहे. ही डे केअर सेंटर्स चालविण्यासाठी हया कार्यकर्त्या व मदतनीस ठरलेल्या वेळेपेक्षा जास्त वेळ काम करीत आहेत. तीन बांधकाम प्रकल्पांवर स्वयंसहाय्यता गट स्थापन झाले असून त्यापैकी दोन गटांचे बँकेत खातेही उघडण्यात आले आहे. प्रतीक्षानगरमध्ये तर स्वयंसहायता गटाने मुलांसाठी अन्न शिजवून देणेही सुरु केले आहे.

एकात्मिक बाल विकास यंत्रणेकडे स्वयंसहायता गटाच्या योजनेची आखणी पूर्ण होईपर्यंत मुलांच्या पूरक पोषक आहाराचा खर्च मुंबई मोबाईल क्रेशेसमार्फत केला जात आहे. स्वयंसहायता गटांच्या योजनेची आखणी एकात्मिक बाल विकास यंत्रणेमध्ये विशेष प्रकल्पांतर्गत होण्याची प्रक्रिया सुरु आहे. मुलांना सेंटरमध्ये दिल्या जाणाऱ्या पदार्थांमध्ये आवश्यक पोषण घटक व उष्मांक आहेत,याची खात्री करण्यासाठी, सध्या दिल्या जाणाऱ्या पदार्थांचे पोषण घटक मुंबई मोबाईल क्रेशेस आणि एकात्मिक बाल विकास यंत्रणा तपासत आहे. उपचारात्मक सुविधा मुलांना उपलब्ध व्हावी यासाठी डॉक्टरांच्या भेटी आयोजित करण्यात येत आहेत. केंद्र व्यवस्थापक आणि पर्यवेक्षक, स्थानिक आरोग्य केंद्राच्या समन्वयाने हे काम करीत आहेत. प्रतीक्षा नगर आणि गणेशनगर येथे आरोग्य केंद्राचा प्रतिसाद चांगला असून तेथे मासिक भेटी आयोजित होत आहेत.

### धारावीतील डे केअर सेंटर – मुलांच्या वजनात वाढ:-

धारावीतील कुंजीकुर्वेनगर येथील डे केअर सेंटरमध्ये मुले दाखल होऊन आता दोन महिने झाले असून, या कालावधीत त्यांच्या वजनवाढीत सकारात्मक बदल दिसून येत आहे. १ ते ३ वर्षे वयोगटातील मुलांची पोषणात्मक आवश्यकता, कुपोषण आणि त्याचे दूरगामी परिणाम, मुलांमधे वजनवाढ, लसीकरणाचे वेळापत्रक व त्याचे महत्त्व, या गोष्टींची चर्चा करण्यासाठी आयोजित केल्या जाणाऱ्या मातांच्या बैठकीसाठी बहुतेक सर्व माता हजर रहात आहेत.

कुंभारवाडयातील केंद्र मुलांना अधिक आकर्षक, मैत्रीपूर्ण वाटावे हया दृष्टीने केंद्राच्या नूतनीकरणाचे काम सुरु आहे. सध्याच्या कोणत्याच अंगणवाडी केंद्रात छोटया मुलांना सामावून घेता येईल एवढी जागा उपलब्ध नसल्याने, कुंभारवाडयाच्या केंद्रांपैकी एक केंद्रच नवीन जागी हलविण्याची प्रक्रिया सुरु आहे.

### जीजीजी प्रकल्प पहाणी - नियोजन मांडणी बैठक:-

जी जी जी प्रकल्प पहाणी व मूल्यमापनाचे नियोजन मांडण्यासाठी भविष्य अलायन्सच्या कार्यालयात ५ जानेवारी २००९ रोजी एक बैठक आयोजित करण्यात आली. 'आय.सी.आर.डब्ल्यू'च्या सुश्री.सुनयना वालिया यांनी ही पहाणी व मूल्यमापनासाठी आवश्यक नोंदी अधिक सुटसुटीत, सोप्या व्हाव्यात हया दृष्टीने केलेले नियोजन सर्व सहयोगी संस्था समन्वयकांसमोर मांडले.



प्रकल्प पहाणी - नियोजन मांडणी बैठक

मुलींसाठी एक स्वयंपहाणी साधन – अन्न रोजनिशीचीही (डायरी)माहिती समन्वयकांना देण्यात आली व त्यांचेबरोबर चर्चा करुन ती निश्चित करण्यात आली. आरोग्य आणि पोषणावर अशा प्रकारचे साधन प्रथमच वापरण्यात येत आहे आणि जर ते पहाणीचे प्रभावी साधन ठरले तर ते मोठया प्रमाणावर वापरता येऊ शकेल.

### मूलचेरा तालुक्यातील येल्ला गावातील मुलींनी घेतलेला पुढाकार:-

गडचिरोली जिल्हयातील मूलचेरा तालुक्यात येल्ला गावात आश्रमशाळांमध्ये आयोजित केलेल्या संध्याकाळच्या सत्रांमध्ये गावातील मुली सहभागी होत असत. मात्र त्यांना एक मोठी समस्या भेडसावत होती ती म्हणजे गावातून आश्रमशाळेकडे जाणाऱ्या रस्त्यावर दिवे नव्हते. सर्व मुली एकत्रितपणे ग्रामपंचायतीच्या कार्यालयात गेल्या आणि त्यांनी, आश्रमशाळेत पोहोचण्यास सुविधा व्हावी म्हणून रस्त्यावर दिवे बसवावेत, अशी मागणी केली. सुरुवातीला ग्रामसेवकाने नकार दिला. हा नकार लेखी मिळावा म्हणून मुलींनी आग्रह धरला. तेव्हा त्यांना लेखी काही मिळाले नाही पण रस्त्यावरचे दिवे मात्र सुरु झाले. आता मुलीच नाही तर संपूर्ण गावच आनंदात आहे.

*वर्षा गेडाम – समन्वयक, जी जी जी प्रकल्प,एन.वाय.के.एस, गडचिरोली*

### 'हात धुणे' प्रकल्पातील मुख्य प्रशिक्षकांचे नंदुरबारमध्ये प्रशिक्षण



हात धुणे प्रकल्पातील प्रमुख प्रशिक्षकांचे प्रशिक्षण

हात धुणे प्रकल्पातील वर्तणूक बदल याबाबत युनिसेफच्या विविध कार्यक्रमातील उदा. स्कूल्स इन डेव्हलपमेंट, उजाला, गावनियोजन (व्हिलेज प्लॅनिंग), एम.सी.एच्.एन्., दीपशिखा इ. कार्यक्रमातील ३० प्रमुख प्रशिक्षकांचे यावेळी प्रशिक्षण घेण्यात आले. हे प्रशिक्षण हिंदुस्तान युनिलिव्हर, ओगिल्व्हि ॲक्शन आणि युनिसेफ यांच्यातर्फे संयुक्तरीत्या नंदुरबार येथील जिल्हा प्रशिक्षण केंद्रात १३ जानेवारी २००९ रोजी झाले.

जिल्हा परिषद , नंदूरबारचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या प्रशिक्षणार्थींना निमंत्रित केले असून, प्रशिक्षणाचा खर्च नंदुरबार जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यामार्फत केला जात आहे. प्रशिक्षणाचे माध्यम मराठी असल्यामुळे सहभागी प्रशिक्षणार्थींचा सहभाग वाढण्यास मदत झाली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी यातून मिळणाऱ्या शिकवणीच्या प्रभावाचा आढावा घेतला आणि त्याचा वापर इतर कार्यक्रमात कसा करता येईल, याबाबत चर्चा केली. हिंदुस्तान युनिलिव्हरच्या स्वास्थ्य चेतना कार्यक्रमातून

घेतलेली आणि सद्य परिस्थितीला अनुकूल होईल असे बदल केलेली प्रशिक्षण कार्यपध्दती यात वापरली गेली. हात धुण्याच्या सवयीत यातून बदल घडून येईल अशी क्षमता त्यामध्ये आहे असे मत सर्वांनी व्यक्त केले. हयातून मिळालेली शिकवण इतरांपर्यंत पोहोचवण्यासाठी इतर कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत हात धुणे हा विषयही घेतला जावा असे या प्रमुख प्रशिक्षणार्थीकडून अपेक्षित आहे.

गाव / वस्ती पातळीवर हे प्रशिक्षण राबवताना उपयुक्त होईल अशा प्रकारच्या साधनांचा संच विकसित केला गेला आणि हया प्रशिक्षणाच्या शेवटी प्रत्येक प्रशिक्षणार्थीला त्याचे वितरण करण्यात आले.

### संगणक सहाय्याने सुरु असलेला प्रौढ साक्षरता कार्यक्रम:-

१५ ते १७ डिसेंबर २००८ यादरम्यान प्रौढ साक्षरता कार्यक्रमातील अतिरिक्त अभ्यासक्रमाची ओळख करुन देण्यात आली आणि सर्वच्या सर्व ३० प्रेरिकांना त्याचे प्रशिक्षण देण्यात आले. या अतिरिक्त अभ्यासक्रमांत माता बालक सुरक्षा पत्रके, मीना – ॲनिमेशन फिल्म सिरीज आणि ब्रेस्ट क्रॉल फिल्म हया युनिसेफने विकसित केलेल्या गोष्टींचा समावेश आहे. राजमाता जिजाऊ मदर ॲण्ड चाईल्ड हेल्थ ॲण्ड न्यूट्रिशन मिशनने जी मदत केली तिचे सर्वांनीच कौतुक केले. मिशनचे श्री. सुदामे यांचे अशा जोशपूर्ण प्रशिक्षणाबद्दल विशेष आभार . माता आणि बाल आरोग्यातील माहिती, ज्ञान, जाणीवजागृती आणि सवयी जाणून घेण्यासाठी एक बेसलाईन करण्याचे नियोजन सुरु आहे. त्यानंतर अतिरिक्त अभ्यासक्रमाला सुरुवात होईल.


अतिरिक्त अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण

### प्रौढ साक्षरता कार्यक्रमातील शिल्पाचा अनुभव :-



मी १९ वर्षांची असताना माझे लग्न झाले. मी लहान असताना,माझ्या आईला, माझे वडिल आणि माझ्या ६ भावंडांचे जेवण बनविण्यासाठी मदत करीत असे. आता मी स्वैपाक घरात काम करते आणि माझ्या स्वत:च्या कुटुंबास -माझे पती व माझा दोन वर्षांचा मुलगा-मदत करते. हे प्रशिक्षण मिळाले नसते तर माझे आयुष्य असेच चालू राहिले असते. अशा प्रकारचे उपक्रम आम्हा सर्वांनाच खूप उपयुक्त आहेत, असे मला वाटते. मी फक्त पाचव्या इयत्तेपर्यंत शिकले आहे. पण आता मी फक्त माझे आयुष्य बदलण्याचे कौशल्य मिळवले नाही तर मी ते माझ्यासारख्या इतर स्त्रियांना देऊ शकेन . आम्हाला अधिक संधी मिळतील असे मला वाटते . माझा आत्मविश्वास आता अधिक वाढला आहे.-शिल्पा , वय २२ वर्षे, पेठ तालुका, जि. नासिक

*मुलाखतकार :- सुमिता करोपदी, कम्युनिकेशन, कॉर्पोरेट रिस्पॉन्सिबिलीटी, इंडियन हॉटेल्स कंपनी लिमिटेड.*

### यशोदा प्रकल्प – शिशू आहारासंबंधी वर्तणूक बदल व संवाद कार्यक्रम:-

युनिसेफ आणि ग्रीन केटल कन्सल्टिंगच्या सदस्यांनी डिसेंबर २००८ मध्ये नंदुरबारला एक विस्तृत भेट दिली. प्रकल्पाच्या दृष्टीने कुपोषणासंबंधी स्थानिक परिस्थिती समजून घेण्यासाठी हया भेटीचे आयोजन करण्यात आले होते. त्याशिवाय जमनालाल बजाज इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीजच्या दोन विद्यार्थ्यांना,


नंदुरबार जिल्हयातील एका गावातील स्वयंपाकघर

जिल्हयात सर्वत्र फिरुन गावातील जगण्याची परिस्थिती आणि गावकऱ्यांचा दृष्टीकोन समजून घेण्यासाठी नियुक्त केले. ग्रीन केटल कन्सल्टिंगची सुश्री. रामा यांनी हया भेटीचा अहवाल एकत्रित केला व इतरांपुढे मांडला, हयाबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो.

*वरील भेटीतून केलेल्या सद्य परिस्थितीच्या निरीक्षणांचा सारांश पुढील प्रमाणे:-*

- अतिशय गंभीर अशी लक्षणे दिसेपर्यंत अनेक महिलांना विशेषत: आतल्या गावातील महिलांना कमी पोषण झालेल्या मुलांकडे विशेष लक्ष देण्याची गरज असते, हे लक्षात येत नाही. न रडता किंवा आवाज न करता बाळ पडून आहे हे चांगल्या आरोग्याचे लक्षण आहे, असे त्या समजतात.
- अंगणवाडी कार्यकर्तीच्या हस्तक्षेपामुळे त्यांना राग येतो-मातांना ती लुडबूड वाटते.
- स्तनदा मातांनी गव्हापासून तयार केलेले पदार्थ खाऊ नयेत. ते त्यांच्या नवजात बाळाच्या आरोग्यासाठी हानिकारक आहे, अशी समजूत आहे.
- दोन वर्षाखालच्या मुलांनाही, कुटुंबातील इतर व्यक्ती जे अन्न शिजवून खातात तेच अन्न थोडया प्रमाणात दिले जाते. दिवसातून ६ वेळा नियमित खाणे मात्र कधीच दिले जात नाही. एकदा का मुलांनी खाणे थांबविले की त्यांना खाण्यास प्रोत्साहन दिले जात नाही. खाणे थांबविले की मुलाचे पोट भरले, असे समजले जाते, मुलांसाठी वेगळे खाणे बनविण्यास मातांना वेळ नसतो. फळे आणि भाज्या प्रौढ व्यक्तीही कमी प्रमाणात खातात.
- अनेक कुटुंबांमध्ये ६ ते ९ महिने वयाच्या मुलांना डाळीचे पाणी किंवा भाताची पेज दिली जाते कारण मुलांना डाळ-तांदूळ पचविता येत नाहीत अशी समजूत आहे.
- मुलांना पूरक खाणे म्हणून बिस्कीटे-विशेषत: पारले जी देण्याची पध्दत आहे कारण बिस्कीटे खायला देणे अगदी सोपे आहे आणि मुलांना ती आवडतात देखील.
- अंगणवाडी केंद्राच्या कार्यकर्त्या ज्या पध्दतीने कार्यक्रम राबवितात त्यात खूप फरक आहे. काही अंगणवाडी केंद्रे जवळपास बंद आहेत तर काही केंद्रे व्यवस्थित सुरु आहेत. टेकडयांवरील वस्त्यांमधील अंगणवाडी केंद्रातील उपस्थिती अतिशय कमी आहे. तेथील अंगणवाडी कार्यकर्ती जर एकदम उत्साही असेल तरच ही उपस्थिती वाढते.
- महिन्यातून दोनदा गावाला भेट देणारे बहुउद्देशीय कार्यकर्ता किंवा नर्स गटचर्चा (काही गावांत तरुण मातांचे गट आहेत) घेतात किंवा भाषणे देतात. हया कार्यकर्त्यांना, नर्सला मान मिळतो आणि आरोग्याच्या बाबतीत त्यांना माहितगार समजले जाते.
- दृश्य खुणा समजणे सोपे जाते. (उदा. आयोडिनयुक्त मीठ हे कोणत्याही कंपनीच्या ब्रॅण्डनावाने नाही पण पाकीटावरील सूर्याच्या चित्राने ओळखले जाते.)

तुम्हाला जर कोणत्याही सूचना, प्रतिसाद किंवा सहभाग द्यायचा असेल तर संगीता दासमोहपात्र यांना लिहा:- sangeeta@bhavishyaalliance.org.in / sangeetadm@yahoo.com, भविष्य अलायन्स, प्लॉट नं.१३१, जे लेन, सागर विहार जवळ, वाशी,नवी मुंबई - ४०० ७०३. Ph: ९१-२२-२७८२३२०२/ २७८२१६५७ फॅक्स : ९१-२२-२७८२४६२९